दै. प्रजावाणी दि. 05/08/2025

# घरफोडीतील साडेपाच लाखांचा मुद्देमाल किनवट पोलिसांनी दिला फिर्यादीस परत

**वार्ताहर • किनवट**



तालुक्यातील धामनदरी येथे कुलूपबंद घर फोडून लंपास केलेल्या ६ लाख २० हजाराच्या मुद्देमालापैकी किनवट पोलिसांनी न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादीस साडेपाच लाखाचा मुद्देमाल रविवारी दि.३ जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या हस्ते परत दिला आहे.

किनवट तालुक्यातील धामनदरी येथील जगदीश जाधव हे दि.१४ मे २०२५ रोजी त्यांच्या पुतण्याच्या लग्नासाठी घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते.ही संधी साधत धामनदरी येथीलच माधव हिरामण राठोड याने जगदीश जाधव यांच्या घराच्या कुलुपाची डुप्लीकेट चावी बनवून त्यांचे घर फोडले. घराच्या कपाटात ठेवलेल्या सोन्या,चांदीच्या दागिन्यांसह माधव राठोड याने ६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.दरम्यान,जगदीश जाधव हे दि.१५ रोजी घरी परतले.त्यावेळी त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले.त्यांनी तातडीने किनवट पोलीस ठाणे गाठून अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीची तक्रार दिली.त्यानुसार पोलिसांनी आधी अज्ञात चोरट्यावर गुन्हा नोंदविला होता.पोलीस निरीक्षक देवीदास चोपडे यांच्या मार्गदर्शनात याप्रकरणाचा तपास फौजदार दत्तात्रय मामीडवार,जमादार तुकाराम वाडगुरे व नितीन भालेराव करीत होते.पोलीस तपासात पोलिसांना सदर घरफोडीबाबत गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार,भोकरच्या अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील,नांदेडचे अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव,किनवटचे डीवायएसपी रामकृष्ण मळघणे यांच्या मार्गदर्शनात किनवट पोलिसांनी धामनदरी येथील माधव राठोड याला ताब्यात घेतले.पोलिसी खाक्या दाखवताच माधव राठोड याने जगदीश जाधव यांचे घर फोडल्याची कबुली दिली.

पोलिसांनी त्याच्याकडून साडेपाच लाखाचे सोन्या,चांदीचे दागिने हस्तगत केले.हस्तगत केलेला मुद्देमाल न्यायालयात जमा करण्यात आला.कायदेशीर सोपस्कारानंतर न्यायालयाच्या आदेशाने रविवारी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या हस्ते फिर्यादी जगदीश जाधव यांना चोरीतील साडेपाच लाखाचा मुद्देमाल परत देण्यात आला.या कामगिरीबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षकांनी किनवट पोलिसांचे कौतुक केले.